दै.बीड

www.beedsuperfast.com

# सुपरफास्ट

संपादक : अतुल शंकरराव जाधव

beedsuperfastgmail.com

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक २७९ ■ शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.

BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-279 ■ Friday 16 October, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4


## परळी तालुक्यात सोयाबीनच्या उत्पादनाचा नीचांक गोवर्धन येथे हेक्टरी अवघा ४ क्विंटल ९५ किलो उतारा

**परळी । प्रतिनिधी**

राज्यात आणि विशेषतः बीड जिल्ह्यात दुष्काळाची भीषण दाहकता दिवसेंदिवस तीव्र होत चालली असून, पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. याचे प्रकर्षाने दर्शन घडवणारी एक अत्यंत चिंताजनक घटना परळी तालुक्यातील गोवर्धन येथे समोर आली आहे. गोवर्धन शिवारात घेण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगात सोयाबीनचा हेक्टरी अवघा ४ क्विंटल.९५ किलो इतका तुटपुंजा उतारा आला आहे.परळी तालुक्यात शेतकरी वर्गासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. गोवर्धन येथे शेतात प्रत्यक्ष उपस्थित राहून पिकांची पाहणी व कापणी प्रयोग करण्यात आला. या शासकीय प्रयोगात हाती आलेले आकडे अंगावर का आणणारे आहेत. अवघ्या ४क्विंटल ९५ किलो प्रति हेक्टर इतका कमी उतारा निघाल्याने संपूर्ण गोवर्धन परिसरात आणि कृषी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने बळीराजा हतबल झाला आहे.

# शाळेत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थीनींवर लक्ष ठेवा

## बालविवाहाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची सुचना



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातून बालविवाहाची अनिष्ट प्रथा समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता पूर्णपणे कंबर कसली आहे. मुलींच्या गळतीचे प्रमाण आणि त्यातून होणारे बालविवाह रोखण्यासाठीबीड जिल्हा प्रशासनाने शिक्षण विभागाला अतिशय कठोर आणि विशेष सूचना दिल्या आहेत. बालविवाहाला आळा

घालण्यासाठी ज्या शाळकरी मुली शाळेत सलग १५ दिवसांपेक्षा जास्त काळ सतत गैरहजर आहेत, अशा मुलींवर विशेष लक्ष ठेवण्याचे आणि या प्रकरणांचा सखोल तपास करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती, बालकल्याण समिती आणि चाईल्ड हेल्पलाईनच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पोलिस उपअधिक्षक राजु नवले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी फारुख शेख, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुदाम निर्मळ, पंचायत व शिक्षण विभागासह बाल कल्याण समितीचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांचे संरक्षण, त्यांच्यावरील कौटुंबिक हिंसाचार रोखणे आणि बालविकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बालविवाह निर्मूलनाच्या कार्यात हयगय आणि निष्काळजीपणा केल्याप्रकरणी गेवराई व धारूर तालुक्याच्या संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. बैठकीदरम्यान बालविवाह झाल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तत्परतेने संबंधित यंत्रणेशी भ्रमणध्वनीवरून थेट संपर्क साधला. बालविवाह झाल्याचे समजताच तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे कडक निर्देश त्यांनी जागेवरच प्रशासनाला दिले. बालविवाह रोखण्याच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

महिलांच्या संरक्षणासाठी हुंडा निर्मूलन, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, देवदासी प्रथा निर्मूलन आणि अनैतिक व्यापार प्रतिबंध यांसारख्या सामाजिक कायद्यांची जिल्ह्यात कशी अंमलबजावणी सुरू आहे, याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच जिल्ह्यातील बालगृहांची एकूण संख्या जाणून घेत, तेथील व्यवस्थेबाबत जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी आवश्यक ते निर्देश दिले. चाईल्ड हेल्पलाईन आणि बालकल्याण समितीने अधिक सक्रियपणे काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी विविध सामाजिक कायदे आणि महिला धोरणांच्या अंमलबजावणीची कडक तपासणी केली.

# कपड्याच्या दुकानाची चोरी एलसीबीने केली उघड

## दोघांना अटक; साडेपाच लाखांच्या चोरीप्रकरणी चौघांची नावे निष्पन्न



**७१ हजार ४०० रुपये जप्त**

**बीड । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरातील गांधी मार्केट परिसरात रेडिमेड कपड्याच्या दुकानाचे शटर उचकटून तब्बल ५ लाख १० हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. या प्रकरणात चार आरोपींची नावे निष्पन्न झाली असून, त्यापैकी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ७१ हजार ४०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. या टोळीचे राजस्थानातील अजमेर येथील चोरीच्या गुन्ह्यांशीही संबंध असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. परळी वैजनाथ येथील अजय कलेक्शन या रेडिमेड कपड्याच्या दुकानात १० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास चोरी झाली होती. चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला आणि सुमारे ५ लाख १० हजार रुपयांची रोकड लंपास केली. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ३३१(१) आणि ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्याकडून सुरू होता. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही चित्रण तपासले तसेच गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला. १४ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीवरून पाटोदा येथे कारवाई करत अकबर लुकमान खान (वय ३२, रा. खजानानगर, जळगाव) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यासोबत असलेल्या परवेज मेहमूद सय्यद (वय २२, रा. भोसले आखाडा, नगर) यालाही ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. तपासादरम्यान दोघांनी या घरफोडीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. त्यांच्याकडून एकूण ७१ हजार ४०० रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणात मोईन बादशाह शेख (रा. मुकुंदनगर नगर) आणि अशफाक सबीर खान (रा. लोहारा, » पान २ वर

# रामदास आठवले यांच्या विराट सभेचे साक्षीदार व्हा : विष्णू जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.



रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे. राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. » पान २ वर

## प्रतापसिंह पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करा; आ. संदीप भैय्यांच्या नेतृत्वाखाली एक जुट

**बीड । प्रतिनिधी**

पदवीधर मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विजयी करण्यासाठी आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष एकजुटीने काम करत असून पदवीधर मतदारांनी भूलथापांना बळी न पडता प्रचंड मताधिक्क्याने डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विजयी करावे. असे आवाहन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष मोमीन मोईनुद्दीन उर्फ गुड्डू भाई यांनी केले आहे. डॉ. प्रतापसिंह पाटील सारख्या



उच्च शिक्षित व्यक्तिमत्वाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने उमेदवारी दिली असून त्यांना पदवीधरांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न व समस्या चांगल्या रीतीने माहित आहे. सुशिक्षित बेरोजगारांसह पदवीधरांना न्याय देण्यासाठी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. प्रतापसिंह पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करायचे आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदवीधर आणि सुशिक्षितांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता डॉ. प्रताप सिंग पाटील यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन ज्येष्ठ नगरसेवक मामू गुत्तेदार, नगरसेवक अफसर खान, नगरसेवक मोहसीन मोमीन, जकी मोमीन गुत्तेदार, जमीर मोमीन यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष मोईनोद्दीन मोमीन यांनी केले आहे.

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहा:महेश आठवले

**बीड । प्रतिनिधी**



केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर » पान २ वर

## मनोज जरांगे पाटील यांचा स्टेटस ठेवल्याने ११ वीच्या विद्यार्थ्याला बेदम मारहाण, कुटुंबाला कापून टाकण्याची धमकी

**केज । शेख वाजेद**

संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे सोशल मीडियावर स्टेटस का ठेवतोस? असे जाब विचारत एका १७ वर्षीय विद्यार्थ्याला चौघांनी बेल्ट आणि काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना केज तालुक्यात घडली आहे.नाव्होली येथील १७ वर्षीय चैतन्य प्रशांत देशमुख हा नांदूरघाट येथील जीवन प्रगती महाविद्यालयात ११ वीत शिकतो. दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता तो कॉलेजसमोर पाणी पीत असताना प्रताप मोराळे, रुतुराज ढाकणे, प्रकाश तांदळे, दिग्विजय मोराळे हे चौघे आले.तू जरांगे पाटलाचे स्टेटस का ठेवतोस? असे विचारताच चैतन्य म्हणाला मला आवडते म्हणून ठेवतो. याचा राग येऊन चौघांनी त्याला बेल्टने, लाकडी काठीने आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर



१०:४५ वाजता तळ्याची आई मंदिराजवळ पुन्हा अडवून यापुढे स्टेटस ठेवलास तर तुला व तुझ्या घरच्यांना कापून टाकू अशी धमकी दिली. मित्र सोडवायला आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आली. गुन्हा दाखलः या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६५२/२०२६, कलम ११५ (२), ११८(१), ३५१(२), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल झाला असून पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर तपास करीत आहेत.

# केज-कळंब मार्गावरील विद्यार्थ्यांसाठी एसटी पासची सुविधा द्या!

## खा.बजरंग बप्पा सोनवणे यांची धारूर आगार व्यवस्थापकांकडे मागणी; विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी पत्र

**केज । शेख वाजेद**

कळंब मार्गावरील इलेक्ट्रिक बसमध्ये विद्यार्थ्यांना पास स्वीकारला जात नसल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक व प्रवासाच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या तातडीने सोडवून विद्यार्थ्यांना नियमानुसार पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धारूर आगार व्यवस्थापकांना दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी लेखी पत्र दिले आहे. इलेक्ट्रिक बसमध्ये विद्यार्थी पास स्वीकारला जात नसल्याची तक्रार खासदार बजरंग सोनवणे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, केज-कळंब मार्गावरील इलेक्ट्रिक बसमध्ये विद्यार्थ्यांचे पास स्वीकारले जात नसल्याने साळेगाव परिसरातील विद्यार्थ्यांना आर्थिक व प्रवासाच्या अडचणींना सामोरे जावे लागत



### पासची सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी

केज-कळंब मार्गावरील इलेक्ट्रिक बसमध्ये नियमानुसार विद्यार्थ्यांना पासची सुविधा तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी स्पष्ट मागणी खासदार सोनवणे यांनी पत्राद्वारे केली आहे. ही सुविधा उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास संबंधित मार्गावरील साध्या एसटी बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी पर्यायी मागणीही त्यांनी केली आहे.

आहे. शिक्षणासाठी दररोज प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा त्रास सहन करावा लागत असल्याने संबंधित यंत्रणेने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नियमित प्रवास करावा लागतो. अशा परिस्थितीत विद्यार्थी पासची सुविधा उपलब्ध नसल्यास त्यांच्या कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी एसटी महामंडळाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी भूमिका खासदारांनी मांडली आहे.

## सावरगाव घाटच्या दसरा मेळाव्याकडे महाराष्ट्राचे लक्ष

### गणेश लांडे यांचे सर्व समाजघटकांना निमंत्रण

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेला आणि सामाजिक एकता, विचारांचा वारसा व



कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणारा माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांचा भव्य दसरा मेळावा मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सावरगाव घाट येथे पार पडणार आहे. या मेळाव्याला समाजातील सर्व घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी केले आहे.

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी दसरा मेळाव्याच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याची आणि समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याची परंपरा जोपासली. त्याच परंपरेचा आणि विचारांचा वारसा पुढे नेत पंकजाताई मुंडे यांच्या दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे या मेळाव्याला सामाजिक व भावनिक महत्त्व प्राप्त झाले असून, कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.दसरा मेळावा हे केवळ एक वार्षिक » पान २ वर

# रुमाल डाव्या हातात घेताच एसीबीने ठोकल्या बेड्या!

## केज लाच प्रकरणात रुमालाचा इशारा ठरला निर्णायक




केज । शेख वाजेद

**चौकशी अहवाल तुमच्या बाजूने देतो, असे म्हणून २० हजार रुपयांची लाच मागितली. मात्र पैसे स्वतः न घेता सोबतच्या शिक्षकाकडे देण्याचा इशारा केला. पैसे खिशात ठेवताच तक्रारदार शिक्षकाने गळ्यातील रुमाल डाव्या हातात घेतला आणि त्याच इशाऱ्यावर दबा धरून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (–उइ) दोघांना रंगेहाथ अटक केली. ही थरारक घटना काल दि. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी ३:३० वाजता केजच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयात घडली.**

### दोन दिवसांची पोलीस कोठडी

**लाचखोर दत्तात्रय चाटे आणि जयगुरु गिरी यांना न्यायालयात हजर केले असता, त्यांना दि. १७ ऑक्टोबरपर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.**

### केज शिक्षण विभागात लाचखोरीचे रॅकेट?

**या कारवाईनंतर केजच्या शिक्षण विभागातील अनेक गैरप्रकार चर्चेत आले आहेत. तक्रार देऊन ती मिटवण्यासाठी पैसे उकळणे, शाळा पोषण आहार आणि ऊसतोड मजुरांच्या पाल्यांच्या निवास व भोजन व्यवस्थेत घोटाळा, तसेच बनावट विद्यार्थी दाखवून पदे वाचवण्याचे प्रकार सुरू असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. दरम्यान, या कारवाईची माहिती मिळताच अनेक शिक्षक पोलीस ठाण्यात जमा झाले होते, मात्र अनेकांच्या चेहऱ्यावर दुःखाऐवजी आनंद दिसत असल्याचे चित्र होते.**

कुंबेफळ येथील जि.प. उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांना तत्कालीन प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांनी शालार्थ वेतन प्रणालीत अनियमितता केल्याबद्दल नोटीस दिली होती. या चौकशीसाठी विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. मुख्याध्यापक कदम यांनी लेखी खुलासा देऊनही दत्तात्रय चाटे यांनी अहवाल अनुकूल देण्यासाठी १ लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर ४० हजार रुपयांवर तडजोड झाली. लाच देण्याची इच्छा नसल्याने कदम यांनी जालना ACB चे पोलीस निरीक्षक जाधवर यांच्याशी संपर्क साधला. रुमालाचा इशारा आणि सापळा ACB ने १४ ऑक्टोबर रोजी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सापळा रचला. कदम यांनी २० हजार रुपये देण्यासाठी आणल्याचे सांगताच, चाटे यांनी शेजारी बसलेले सहशिक्षक जयगुरु गिरी यांच्याकडे पैसे देण्याचा इशारा केला. गिरी यांनी पैसे घेऊन पँटच्या खिशात ठेवताच, कदम कार्यालयाबाहेर आले आणि खांद्यावरील रुमाल डाव्या हातात घेतला. हाच इशारा मिळताच ACB पथकाने दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस उपअधीक्षक बाळू जाधवर यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६५४/२०२६ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

**केंद्रीय मंत्री रामदास...**

१ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले मझर खान, राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

**रामदास आठवले यांच्या...**

शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा प्रसिद्धिप्रमुख विष्णू जोगदंड, जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, मझर खान, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

**कपड्याच्या दुकानाची चोरी...**

ता. पाचोरा, जि. जळगाव) यादोन आरोपींची नावे निष्पन्न झाली असून, ते फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच, राजस्थानमधील अजमेर येथील गांज पोलीस ठाणे आणि आदर्शनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या चोरीच्या दोन गुन्ह्यांशीही आरोपींचा संबंध असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या अनुषंगाने पुढील तपास सुरू असून, आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे आणि पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

**लाडेवडगावला पाणी टंचाईच्या...**

कोरड्या दुष्काळाने विहिरीच्या पाणी साठ्यात वाढ झालेली नसून उपलब्ध असलेल्या पाण्याने तळ गाठला आहे. त्यामुळे पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळ्याचे दिवस संपताच टंचाई तीव्र झाल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गावात मंजूर झालेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम निकृष्ट झाल्याने आणि जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजनेचे काम अर्धवट राहिल्याने नागरिकांवर पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे.

यंदा पाऊसकाळ न झाल्याने गावाजवळ असलेल्या विहीरी आणि बोअरला ही पाणी साठा उपलब्ध नसून पावसाळा संपताच पाण्याची विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हिवाळा आणि उन्हाळ्याच्या दिवसात पिण्याच्या पाण्याचे काय होईल ? असा प्रश्न ग्रामस्थांसमोर उभा राहिला आहे. यापूर्वी ही पाण्यासाठी काही दुर्घटना घडल्या असून भविष्यात ही पाण्यासाठी कुणाच्या जीवावर बेतू नये, याची खबरदारी म्हणून तातडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी राहुल गिणाजी शिंदे व ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति पालकमंत्री, पाणी पुरवठा मंत्री, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांना ही देण्यात आल्या आहेत.

**सावरगाव घाटच्या दसरा...**

आयोजन नसून, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारे, विचारांची देवाणघेवाण घडवणारे आणि जनतेशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणारे व्यासपीठ आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा संदेश अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**भीषण दुष्काळामुळे घरपट्टी...**

सवाल केला. नागरिकांची कर भरण्याची आर्थिक क्षमता उरलेली नसताना नगरपालिकेने करवसुलीचा तगादा न लावता घरपट्टी व पाणीपट्टी पूर्णपणे माफ करून बीडकरांना दिलासा दिला पाहिजे, असा खणखणीत युक्तिवाद त्यांनी मांडला.

शहरवासीयांना भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर बोट ठेवताना गिराम पाटील म्हणाले की, दुष्काळामुळे जनता आधीच होरपळून निघत आहे, त्यातच नगरपालिकेकडून शहरात वेळेवर आणि नियमित पाणीपुरवठा केला जात नाही. नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ही अत्यंत खेदजनक बाब असून नगरपालिकेने तात्काळ उपाययोजना करून शहरात सुरळीत व नियमित पाणी पुरवठा सुरू करावा.

**गर्दीत चोरी गेलेली...**

पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.रामभाऊ अश्रुबा मोहिते (रा. जिरेवाडी ता. जि.बीड) यांची सत्काराच्या गर्दीत सोन्याची साखळी चोरी गेली. चोरी गेलेली साखळी पुन्हा मिळण्याची आशा जवळपास मावळली होती. तरीही पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलीस हवालदार प्रसाद कदम यांनी तपासासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही देत धीर दिला. तसेच सोहळ्यातील फोटो आणि व्हिडिओ उपलब्ध करून देण्याची विनंती केली. उपलब्ध फोटो व व्हिडिओंच्या आधारे पोलिसांनी तपासाला गती दिली. या तपासातून आरोपी निष्पन्न करून चोरीला गेलेली सोनसाखळी मिळवण्यात पोलिसांना यश आले. सोनसाखळी मिळाल्याचा निरोप मिळाल्यानंतर सुरुवातीला विश्वासच बसत नव्हता. मात्र, प्रत्यक्ष सोनसाखळी पाहिल्यानंतर आप्पा मोहिते यांच्यासह ग्रामस्थांचा आनंद द्विगुणित झाला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोनसाखळी रामभाऊ मोहिते यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

**मराठवाडा पदवीधर निवडणुकीत...**

शंकर जाधव, वडवणीचे महादेव जमाले, परळीचे बाबासाहेब शिंदे, पाटोद्याचे आनंद जाधव, गेवराईचे राजेंद्र मोटे, शिरूरचे जालिंदर थिटे, धारूरचे युवराज लगड, अखिलभाई यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

महाविकास आघाडीचे पुरस्कृत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी सर्व तालुकाध्यक्ष आणि पदाधिकारी सक्रिय झाले आहेत. पदवीधर मतदारांशी थेट संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची माहिती घेणे, उमेदवाराची भूमिका त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आणि मतदारांशी संपर्क अधिक दृढ करणे, यासाठी तालुकानिहाय संपर्क मोहीम राबविण्यात येणार आहे.दरम्यान, महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार यांच्या जिल्ह्यातील विकासकामांतील योगदान आणि जनसंपर्का बाबत राजेंद्र मस्के यांनी प्रश्न उपस्थित केले. जिल्ह्यातील काही मतदारांमध्ये या मुद्द्यांवर नाराजी असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. प्रतापसिंह पाटील यांना पदवीधर मतदारांकडून प्रथम पसंती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**समीर काझी, स्वप्नील...**

आघाडीचे जिल्हाप्रमुख मोहम्मद अझहरुद्दीन (ए. एस. गोलू) यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला हे यश आले आहे.प्रशासनाने तांत्रिक अडचण दूर करून वेतन देयक मंजुरीचा ऑनलाइन ‘टॅब’ (बटन) पुन्हा सुरू केला आहे.शासकीय प्रणालीमध्ये शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनला उपलब्ध असलेला वेतन देयक मंजुरीचा ऑनलाइन ‘टॅब’ तांत्रिक कारणास्तव बंद पडला होता. त्यामुळे जिल्ह्यातील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सप्टेंबर महिन्याची वेतन देयके अडकून पडली होती.

आगामी काळात घटस्थापना, नवरात्रोत्सव आणि दिवाळी यांसारखे मोठे सण-उत्सव येत असल्याने वेतन न मिळाल्यास कर्मचाऱ्यांसमोर घरखर्च, कर्जाचे हफ्ते (एचख) आणि वैद्यकीय खर्चाचे मोठे संकट उभे ठाकले होते.या समस्येची गंभीर दखल घेत मोहम्मद अझहरुद्दीन (ए.एस. गोलू) यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद बीड येथील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन सादर केले होते.या प्रश्नावर केवळ बीडमध्येच नाही तर पुणे आणि मंत्रालय (मुंबई) पातळीवर तांत्रिक विभागाकडे पाठपुरावा करणे गरजेचे होते. त्यासाठी शिवसेना नेते समीर काझी व जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी पुणे-मुंबई पर्यंत वरिष्ठ पातळीवर सातत्याने पाठपुरावा करून ए.एस. गोलू यांना मोलाची मदत केली. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हा ‘टॅब’ तातडीने सुरू होऊ शकला.

कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

शिक्षण विभाग व संबंधित तांत्रिक विभागाने तातडीने हालचाली करत तांत्रिक अडचण दूर केली असून सणांआधीच वेतन जमा होणार असल्याने जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरले आहे.याबद्दल शिक्षक संघटनांनी शिवसेना नेते समीर काझी, जिल्हाप्रमुख शिव सेना स्वप्नील गलधर व ए.एस. गोलू यांचे आभार मानले आहेत.



# शेतकरी, कामगार, ऊसतोड मजूर व वाहतूकदारांच्या हस्ते कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ




**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या युनिट क्र. १ अंकुशनगर येथील २०२६-२७ च्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शेतकरी, कर्मचारी, कामगार, ऊसतोड मजूर व वाहतूकदारांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा संकल्प करण्यात आला. युनिट क्र. १ येथे ऊस उत्पादक सभासद गंगाराम नामदेव काटकर (पाथरवाला बुद्रुक), नारायण शिवाजीराव वायाळ (वडीगोद्री), ऊस वाहतूक कंत्राटदार बबन आसाराम पिसुळे (खापरदेव हिवरा), ऊस तोडणी कंत्राटदार श्रीहरी रंगनाथ बोबडे (तीर्थपुरी), टायर गाडीवान राजू कचरू काळे (कुरण), चीफ अकाउंटंट शरद बर्डे,टी. व्ही. उडदंगे तसेच युनिट क्र. ३ येथे ऊस उत्पादक सभासद उद्धव मुक्ताराम तारख (अंतरवाली सराटी), रावसाहेब बप्पासाहेब कणके (भांबेरी), ऊस वाहतूक कंत्राटदार राहुल भानुदास राठोड (पिठोरी सिरसगाव), ऊस तोडणी कंत्राटदार राधेश्याम रामप्रसाद लाड (शेवता), टायर गाडीवान लक्ष्मण भास्कर खराड (डोमलगाव), मेंटेनन्स मॅनेजर प्रसाद जिरवणकर व फिटर हेल्पर वाय. बी. देशमुख यांच्या शुभ हस्ते व माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना राजेश टोपे म्हणाले की, कारखान्याच्या यशस्वी वाटचालीत सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड व वाहतूक कंत्राटदार, मजूर, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. या सर्व घटकांच्या प्रतिनिधींच्या हस्ते गळीत हंगाम सुरू करून कष्टकऱ्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न केला आहे. दुष्काळी परिस्थिती व पाण्याचा अभाव लक्षात घेता यंदाचा हंगाम दरवर्षीपेक्षा लवकर सुरू होत आहे. सहकारी साखर कारखाना हे शेतकऱ्यांचे मंदिर असून, राजकारण व स्वार्थ बाजूला ठेवून काम करण्याची भूमिका कारखान्याने ठेवली आहे.

# सायबर फ्रॉड गुन्ह्यातील फिर्यादीस तेरा लाख रुपये मिळवून देण्यात ॲड. किशोर खेडकर यांना यश

**बीड । प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच पाच सायबर गुन्ह्याच्या प्रकरणात फिर्यादीस मा.०४ थे व ७ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड दाखल प्रकरणात दी ०५/०६/२०२६ रोजी की.फो क्र : ४३३/२०२६ ,०४/०९/२०२६ की.फो क्र ७७४/२०२६ ,दी २१/०९/२०२६ की.फो क्र ८२६/२०२६ ,दी २२/०९/२०२६ , की.फो क्र ८३३/२०२६ व दी २८/०९/२०२६ की.फो क्र ८४३/२०२६ ॲड. किशोर खेडकर यांनी पाचही



प्रकारातील फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून सर्व फिर्यादीस तेरा लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.फिर्यादीचे खाते देखील सुरळीत चालू करून देण्यात आले आहे. या सर्व संबंधित प्रकरणात दि ०७/१०/२०२६ रोजी सुनावणीत मा. ४ थे न्यायालयाने आदेश दिले. सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून सर्व फिर्यादीस तेरा लाख रुपये देण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. या कामी ड.सतीश चव्हाण याचे सहकार्य लाभले ड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# अदनान खान यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार संघातर्फे शुभेच्छांचा वर्षाव



**बीड । प्रतिनिधी**

सायं दैनिक किसानचे कार्यकारी संपादक अदनान खान यांचा नुकताच वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बीडचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी यासिरुद्दीन काझी यांनीही अदनान खान यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष शेख आयेशा, बीड जिल्हा उपाध्यक्ष रईस खान, उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा सहसचिव अमोल शिंदे, दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. उपस्थितांनी अदनान खान यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांना फळे वाटून शेंडगे सरांचा आदर्श वाढदिवस साजरा

**बुद्धिबळातून विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर नेण्याचा ध्यास; शिक्षक प्रेमिकांकडून अनोखा गौरव**



**वडवणी । प्रतिनिधी**

चिंचोटी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक श्री. रामप्रसाद शेंडगे सर यांचा वाढदिवस विद्यार्थ्यांना फळे वाटप करून आगळ्यावेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. दोस्ती ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. शेंडगे सर हे केवळ अध्यापन करणारे शिक्षक नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे शिक्षक म्हणून शाळेच्या परिसरात परिचित आहेत. 'माझ्या शाळेतील विद्यार्थी तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर खेळला पाहिजे, त्याचे नाव झाले पाहिजे' हा ध्यास मनात ठेवून ते विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात प्रोत्साहन देत असतात. विशेषतः बुद्धिबळाच्या क्षेत्रात शेंडगे सरांनी घेतलेल्या मेहनतीला यश मिळाले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचोटी शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरासह जिल्हास्तरावरही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांनी विभागीय स्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध करावी, यासाठी सर सातत्याने प्रयत्नशील असतात. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून काल शेंडगे सर हिंगोली येथे विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी गेले होते. त्यामुळे ते वाढदिवशी शाळेत उपस्थित नव्हते. मात्र, शेंडगे सरांचा वाढदिवस केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित न ठेवता तो 'आदर्श वाढदिवस' म्हणून साजरा करण्याचा संकल्प शिक्षक प्रेमिकांनी केला आणि विद्यार्थ्यांना फळे वाटप करून सरांचा वाढदिवस साजरा केला.



**आदर्श शिक्षण संस्था संचालित वडगांव हायस्कूल वडगांव गुंधा ता.जि. बीड येथे बीड जिल्ह्याच्या शिल्पकार मा. खा.स्व सौ. केशरबाई काकू क्षीरसागर व लोकनेते सोनाजीराव नाना क्षीरसागर यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार शाळेचे मुख्याध्यापक माणिक अनुसे सर व सर्व शिक्षकवृंद यांच्या शुभहस्ते करण्यात आली, यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले श्रीमती मोरे मॅडम यांनी काकूंबद्दल आपले मनोगत व्यक्त केले व काकु सोबत घडलेल्या अनेक प्रसंगांची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच अध्यक्षीय समारोप करताना शाळेचे मुख्याध्यापक माणिक अनुसे सर यांनी लोकनेत्या काकू च्या सामाजिक राजकीय शैक्षणिक कार्य विषयी माहिती सांगितली याप्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री काळे सर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री शिंदे सर सर यांनी केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.**

# पाचोड येथे मौलाना हुजेब वस्तवी यांचे स्वागत



**बीड । प्रतिनिधी**

पाचोड येथे आगमन झाल्यानंतर मौलाना हुजेब वस्तवी यांचे मोसंबी मार्केटचे व्यापारी हाजी बाबूभाई मिर्ची बागवान यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी उपस्थित मान्यवर.

# श्रृंगेरी देवी मंदिरात चोरी

## ६४ हजार रूपयांचा ऐवज लंपास

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव येथील श्रृंगेरी देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत देवीचे चांदीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण ६४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना शनिवार दि ३ रोजी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव येथील जागृत असलेले श्रृंगेरी देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय मारुती हराळ (वय ५२) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. मंदिरात देखभालीसाठी आणि राखणदार म्हणून बाळू निकाळजे यांची नेमणूक केलेली आहे. शनिवारी रात्री ११ ते १२ च्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या चॅनेल गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. रविवारी (ता. ४) सकाळी आठ वाजता मंदिराचे पुजारी कल्याण निंबाळकर यांना कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी तात्काळ हराळ यांना फोनवरून याची माहिती दिली. त्यानंतर हराळ यांनी सरपंच रोहिदास पवार यांच्यासोबत मंदिरात जाऊन पाहणी केली असता चोरीचा प्रकार समोर आला. चोरट्यांनी देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश करून देवीच्या अंगावरील १५ हजार रुपयांचे १२ बेंटेक्सचे अलंकार, ४ हजार रुपयांचे २ बेंटेक्सचे टोप, ४० हजार रुपये किमतीचा एक चांदीचा गणपती, ३ हजार रुपयांच्या २ पितळी मूर्ती आणि २ हजार रुपयांच्या बेंटेक्सच्या दोन नथी असा एकूण ६४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. यासोबतच दानपेटीचे कडी कोयंडा आणि कुलूप तोडून त्यातील रोख रक्कमही पळवली आहे. दानपेटीत नेमकी किती रक्कम होती, हे मात्र समजू शकलेले नाही. याप्रकरणी विजय हराळ यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस हवालदार विकास जाधव करत आहेत.

# कै. सुभाषराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त इंदोरीकर महाराजांचे कीर्तन : सभापती जयदत्त नरवडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

कै. सुभाषराव रामराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुलतानपूर-माळेवाडी येथील मारोती मंदिरासमोर हा कीर्तन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांनी केले आहे. इंदोरीकर महाराजांच्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधनासोबतच आध्यात्मिक विचारांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. कीर्तनाच्या दिवशी दुपारी १ वाजल्यापासून उपस्थितांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. कीर्तनाची वेळ सायंकाळी ५ ते ७ अशी असून, वेळेवर सुरू होणाऱ्या या कार्यक्रमास सर्व गुणिजनांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सभापती जयदत्त अण्णा नरवडे, अशोक नरवडे, अंकुश नरवडे, डॉ. ज्ञानेश्वर नरवडे, शशिकांत नरवडे, संजय नरवडे, संतोष नरवडे, डॉ. कैलास नरवडे, डॉ. बाबासाहेब नरवडे व समस्त नरवडे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# पाहणी दौऱ्यांचे 'नाटक' थांबवा; दिवाळीपूर्वी सरसकट मदत द्या!

## अन्यथा काँग्रेसचा तीव्र आक्रोश मोर्चा; राहुल जाधव यांचा सरकारला इशारा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पावसाने दडी मारल्याने खरिप हंगाम पूर्णपणे संकटात सापडला असून पाटोदा तालुक्यातील सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यासह विविध पिके करपून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला असताना केवळ पाहणी दौरे आणि पंचनाम्यांच्या प्रक्रियेत वेळ घालवण्याऐवजी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर सरसकट आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी केली आहे. 'वाळलेल्या काड्या पाहून काय साध्य होणार?' पाटोदा तालुक्यात पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने शेतातील उभी पिके अक्षरशः जळून गेली आहेत. सोयाबीनच्या वाळलेल्या काड्या, करपलेला कापूस आणि पिकांची झालेली दुरवस्था पाहण्यासाठी मंत्री व लोकप्रतिनिधींचे दौरे सुरू आहेत. मात्र, या पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या हाती प्रत्यक्ष मदत कधी येणार, असा सवाल राहुल जाधव यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या शेतातील वाळलेल्या सोयाबीनच्या काड्या पाहून नेमके काय साध्य होणार? शेतकऱ्यांना आता पाहणी नको, तर तातडीची मदत हवी आहे, असे जाधव यांनी म्हटले आहे. पंचनाम्यांच्या नावाखाली वेळकाढूपणा नको पाहणी दौरे आणि पंचनाम्यांच्या नावाखाली प्रशासनाकडून वेळकाढूपणा होऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली. पाटोदा तालुक्यातील पिकांची परिस्थिती प्रत्यक्ष शेतात दिसून येत असताना पुन्हा पुन्हा कागदी सोपस्कार करण्यापेक्षा शासनाने वस्तुस्थिती लक्षात घेऊन तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा, असे जाधव यांनी सांगितले. शेतकऱ्यांवर खरीप हंगामातील नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि आगामी दिवाळीचा आर्थिक ताण अशी अनेक संकटे एकाच वेळी आली आहेत. त्यामुळे दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. मदत न मिळाल्यास तीव्र आक्रोश मोर्चा सरकारने पाहणी दौरे आणि कागदी प्रक्रियेपलीकडे जाऊन तातडीने मदतीची घोषणा करावी. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा झाली नाही, तर काँग्रेसच्या वतीने तीव्र आक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा राहुल जाधव यांनी दिला. शेतकऱ्यांना आता आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. दिवाळीच्या तोंडावर शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना सरकारने निर्णय घेण्यास आणखी विलंब करू नये, अशी मागणी त्यांनी केली आहे.



# निष्काळजीपणामुळे शिक्षकाचा बळी घेणाऱ्या 'अजमेरा कन्स्ट्रक्शन'वर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

## उमेश शिंदे यांचे गेवराईत आंदोलन व निवेदनाद्वारे ७२ तासांचा अल्टिमेटम

**गेवराई । प्रतिनिधी**

महामार्गावरील नियमबाह्य आणि जीवघेण्या गतिरोधकामुळे एका ज्येष्ठ निवृत्त शिक्षकाला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेवराई-चकलांबा महामार्गावरील देवपिंपरी येथे रस्ता दुरुस्तीचे काम करणाऱ्या 'अजमेरा कन्स्ट्रक्शन' कंपनी आणि संबंधित इंजिनिअरच्या कमालीच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप करत, युवासेना विधानसभा प्रमुख मा. उमेश धर्मराज शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज गेवराईचे तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाला धारेवर धरले. तसेच संबंधित दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे लेखी निवेदन सादर केले. १० दिवसांत ३ गंभीर अपघात, प्रशासनाचे दुर्लक्ष मिळालेल्या माहितीनुसार, देवपिंपरी परिसरातील महामार्गावर 'अजमेरा कन्स्ट्रक्शन' कंपनीमार्फत काम सुरू आहे. कंपनीचे इंजिनिअर नवले आणि कंत्राटदाराने सुरक्षेचे कोणतेही नियम न पाळता, कोणतीही पूर्वसूचना किंवा दिशादर्शक फलक (रेडियम इंडिकेटर्स) न लावता अत्यंत उंच व जीवघेणा गतिरोधक (स्पीड ब्रेकर) तयार केला आहे. या बेकायदेशीर गतिरोधकामुळे गेल्या अवघ्या १० दिवसांत ३ गंभीर अपघात झाले आहेत. या निष्काळजीपणाची परिसीमा म्हणजे ५ ऑक्टोबर रोजी परिसरातील सन्माननीय निवृत्त शिक्षक श्री. पोपट खेडकर यांचा या गतिरोधकावरून झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. एका निष्पाप नागरिकाचा आणि शिक्षकाचा बळी जाण्यास अजमेरा कन्स्ट्रक्शन कंपनीच पूर्णपणे कारणीभूत असल्याचा संताप स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



# सिरसाळा येथे बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा ढिसाळ कारभार

## कर्जमाफीचे पैसे मिळूनही शेतकरी लाभापासून वंचित

**सिरसाळा । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील सिरसाळा येथील बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (DCC Bank) व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांचा कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला असून, त्यांच्या मनमानी कारभारामुळे परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. शासनाकडून कर्जमाफीच्या याद्या जाहीर होऊन दोन महिन्यांहून अधिक काळ उलटला आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम वर्ग झाली असली, तरीही या बँकेचे कर्मचारी मात्र याकडे साफ दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांमधून केला जात आहे. यंदा पावसाअभावी खरीप हंगाम हातातून गेल्याने शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना नवीन पीक कर्जाची आणि आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. परंतु, सिरसाळा शाखेतील कर्मचारी पात्र शेतकऱ्यांचे कागदपत्रे जमा करून न घेता त्यांना नवीन लाभापासून वंचित ठेवत आहेत. बँकेच्या या बेजबाबदार व 'गेंड्याच्या कातडीच्या' भूमिकेमुळे बँक प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे नियोजन; जिल्हा बँक मात्र सुस्त एकीकडे महाराष्ट्र ग्रामीण बँकेने योग्य व काटेकोर नियोजन करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर वेळेत कर्जमाफीची रक्कम जमा केली आहे, तर दुसरीकडे बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्मचारी मात्र गाढ झोपेचे सोंग घेत आहेत. एकाच गावातील दोन वेगवेगळ्या बँकांच्या कारभारातील हा फरक स्पष्टपणे दिसून येत असून, जिल्हा बँकेच्या या ढिसाळ व मग्रूर कारभारामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बँक प्रशासनाने तात्काळ या प्रकरणी लक्ष देऊन कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि शेतकरी बांधवांचे कागदपत्रे स्वीकारून त्यांना नवीन कर्ज व इतर शासकीय लाभ त्वरित मिळवून द्यावेत, अशी आग्रही मागणी सिरसाळा परिसरातील शेतकरी करत आहेत. मागणी मान्य न झाल्यास बँक प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांचा वाढदिवस न साजरा करण्याचा निर्णय

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदतीचे आवाहन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यात आणि परिसरात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अंबाजोगाई नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी दसऱ्याच्या दिवशी येणारा आपला वाढदिवस साजरा न करण्याचा अत्यंत स्तुत्य आणि संवेदनशील निर्णय घेतला आहे. त्यांनी आपल्या हितचिंतकांना आणि कार्यकर्त्यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, शाल किंवा बॅनरबाजीवर खर्च न करता ती रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दान करण्याचे आवाहन केले आहे. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दुष्काळाचे भान आणि सामाजिक बांधिलकी सध्या सर्वसामान्यांना आणि विशेषतः बळीराजाला दुष्काळाच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. अशा कठीण प्रसंगी कोणताही मोठा उत्सव साजरा करणे योग्य नसल्याची भावना मुंदडा यांनी व्यक्त केली आहे. दरवर्षी दसऱ्याच्या मुहूर्तावर त्यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिक मोठ्या संख्येने शुभेच्छा देण्यासाठी आणि आनंदात सहभागी होण्यासाठी एकत्र येतात. मात्र यंदा परिस्थिती वेगळी असल्याने त्यांनी सर्वांना अत्यंत नम्रपणे वाढदिवस साजरा न करण्याची विनंती केली आहे. कार्यकर्त्यांनी जाहिराती, बॅनर किंवा हारतुऱ्यांवर अनावश्यक खर्च करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी इच्छादान पेटी

वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी मुंदडा यांनी एक आदर्श पर्याय उपलब्ध करून दिला आहे. पुष्पगुच्छ किंवा शाल आणण्याऐवजी नागरिकांनी ती रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ठेवलेल्या इच्छादान पेटीत जमा करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. या संकलित निधीतून दुष्काळग्रस्तांना थेट मदत पोहोचवता येईल, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. जनतेचे प्रेम आणि सहकार्य असेच कायम राहावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

---

## दुष्काळात नागरिकांना करांचा बोजा कशाला? घरपट्टी-पाणीपट्टी माफ करा!-सय्यद खालेद पत्रकार

**नेकनूर । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात भयंकर दुष्काळ पडला असुन शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. शेतीचे नुकसान, उत्पन्नात घट आणि वाढत्या खर्चामुळे नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी ग्रामपंचायत नेकनूरने घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याबाबत पुढाकार घ्यावा, अशी मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार सय्यद खालेद यांनी केली आहे.यंदाच्या भयंकर दुष्काळाचा ग्रामीण भागातील जनजीवनावर परिणाम होत आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, दैनंदिन गरजा भागवितानाही अनेक अडचणी येत आहेत. अशा वेळी घरपट्टी आणि पाणीपट्टीचा आर्थिक भार कमी करण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा. शासनाच्या नियमांनुसार पात्र नागरिकांना करमाफी किंवा सवलत मिळवून देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी सय्यद खालेद यांनी केली आहे.नेकनूर येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याबाबत अडचणींचा सामना करावा लागत आहे यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. गावातील पाणीपुरवठा योजनेची स्थिती तपासून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा. ज्या भागात पाण्याची टंचाई आहे, तेथे पर्यायी व्यवस्था करून नागरिकांना दिलासा द्यावा. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

---

## भीषण दुष्काळामुळे घरपट्टी, पाणीपट्टी पूर्णतः माफ करा!

### जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांची नगरपालिकेकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सर्वत्र भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सर्वसामान्यांचे जनजीवन पार विस्कळीत झाले आहे. या गंभीर संकटाची दखल घेत बीड नगरपालिकेने शहरातील नागरिकांची घरपट्टी आणि पाणीपट्टी (नळपट्टी) पूर्णतः माफ करावी, अशी ठाम मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.



राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करून मोठा दिलासा दिला आहे. याच धर्तीवर स्थानिक पातळीवर बीड नगरपालिकेने औदार्य दाखवणे गरजेचे आहे, असे सांगत उल्हास गिराम पाटील यांनी प्रशासनाला

» पान २ वर

---

## गर्दीत चोरी गेलेली दीड तोळ्याची सोनसाखळी फिर्यादीकडे सुपूर्द!

### बीड ग्रामीण पोलिसांच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील मुंबईकडे जात असताना रामनगर-जिरेवाडी ग्रामस्थांच्यावतीने महालक्ष्मी चौक येथे आयोजित सत्कार सोहळ्यात गर्दीचा फायदा घेत चोरट्याने रामभाऊ मोहिते यांच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोनसाखळी लंपास केली होती. मात्र, बीड



ग्रामीण पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत चोरीला गेलेली सोनसाखळी शोधून काढली. पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामस्थांच्यावतीने पोलीस हवालदार प्रसाद कदम, विजय जाधव यांच्यासह वरिष्ठ

» पान २ वर

---

## मराठवाडा पदवीधर निवडणुकीत डॉ. प्रतापसिंह पाटलांचा विजय निश्चित! - राजेंद्र मस्के

### तालुकाध्यक्ष थेट मतदार संपर्क मोहीम राबवणार!

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील पेपरफुटी प्रकरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि सुशिक्षित वर्गामध्ये सरकारविषयी नाराजी असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी ठाम विश्वास व्यक्त केला.मराठवाडा विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अध्यक्षतेखाली सर्व तालुकाध्यक्षांची आढावा बैठक पार पडली. या



बैठकीत निवडणूक प्रचाराचे नियोजन, पदवीधर मतदारांशी थेट संपर्क आणि संघटनात्मक पातळीवर प्रचार अधिक गतिमान करण्याबाबत चर्चा करण्यात आली.या बैठकीस केजचे

» पान २ वर

---

## बीड नगर परिषदेत आरटीआयला विलंब

### तत्कालीन जनमाहिती अधिकाऱ्याला ५ हजारांचा दंड!

**बीड । प्रतिनिधी**



माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागविलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने बीड नगर परिषदेच्या तत्कालीन जनमाहिती अधिकाऱ्याला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. या दंडाची रक्कम संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल करून शासनाच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश बीड नगर परिषद प्रशासनाने दिल्याची माहिती समोर आली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे शेख मुबीन शेख मोईन यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला आहे. बीड नगर परिषदेच्या प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला दंडवसुलीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.उपलब्ध कागदपत्रांनुसार, हे प्रकरण माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९(३) अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या द्वितीय अपील क्रमांक ८४७८/२०२१ शी संबंधित आहे. या प्रकरणात राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने ६ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश क्रमांक ८२३९ पारित केल्याचा उल्लेख नगर परिषदेच्या पत्रात करण्यात आला आहे.संबंधित प्रकरणात मागितलेली माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने प्रथम अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील करण्यात आले. अखेर हे प्रकरण राज्य माहिती आयोगापर्यंत पोहोचले. आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जनमाहिती अधिकाऱ्यावर ५ हजार रुपयांची शास्ती लावण्यात आली आहे.

---

### वैदेही ग्रोसह संबंधित संस्थांची चौकशी करा

## पशुपालकांचे पैसे परत द्या; वैदेही ग्रो प्रकरणी नितीन सोनवणे आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**



मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली पशुपालक व मेंढपाळांकडून पैसे घेतल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांची रक्कम परत मिळवून द्यावी, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने केली आहे. वैदेही ग्रो फार्मिंग प्रकरणातील संबंधितांची भूमिका तपासून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच बीड जिल्ह्यातील संबंधित ग्रो संस्थांचीही चौकशी करावी, अशी मागणी संघटनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

बीड जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी, पशुपालक आणि मेंढपाळ आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. जनावरांसाठी चारा-पाणी उपलब्ध करणे आणि पशुधनाचे संगोपन करणे कठीण झाले असताना, शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक झाल्याचे आरोप समोर आल्याने या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.प्रसिद्ध वृत्तानुसार, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची फाइल तयार करून मंजूर करून देण्याच्या नावाखाली पशुपालकांकडून प्रत्येकी १० ते १५ हजार रुपये घेतल्याचा आरोप असून, अंतिम मंजुरीनंतर पाच टक्के रक्कम घेण्याचे सांगितल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी वैदेही ग्रो फार्मिंगच्या संचालिका पुष्पा राऊत यांच्याविरुद्ध बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

---

## समीर काझी, स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली ए.एस.गोलू यांच्या पाठपुराव्याला यश

### वेतनाचा ऑनलाइन टॅब सुरू, दिवाळीपूर्वी वेतन जमा होणार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक व इतर संस्थांमधील प्राथमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबर महिन्याचे वेतन तातडीने अदा करण्याबाबत करण्यात आलेल्या मागणीला अखेर मोठे यश मिळाले आहे.शिवसेना महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष (अल्पसंख्याक) समीर काझी व शिवसेना बीड जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली शिवसेना अल्पसंख्याक

» पान २ वर

---

# लाडेवडगावला पाणी टंचाईच्या झळा

## पेयजलचे काम निकृष्ट, जलजीवनचे काम अर्धवट राहिल्याचा फटका

**केज । प्रतिनिधी**

कोरड्या दुष्काळामुळे लाडेवडगाव (ता. केज) पाणी टंचाई निर्माण झाली असून नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. तर राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम निकृष्ट झाल्याने व जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मंजूर योजनेचे काम अर्धवट राहिल्याचा फटका बसला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी राहुल गिणाजी शिंदे व ग्रामस्थांनी केली आहे.

लाडेवडगाव (ता. केज) येथे राष्ट्रीय पेयजल योजना व जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजनेतून करण्यात आलेल्या विहिरीतून पाईपलाईनद्वारे गावाला पाणी पुरवठा केला जातो. मात्र यंदा

» पान २ वर



दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकिजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV